www.lokrakshanay.com

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

# लोकरक्षणाय

●LOKRAKSHANAY ●RNI.REG.NO. MAHBIL/2023/86118

●Executive editor- Aniket Ghanshyam Bhankal ●Daily ●Thane ●Volume-01, Issue-227 ●Wednesday, 24 January 2024 ●Pages-04 ●Rs.2/-

## अनमोल विचार

"स्वतःला सोन्याच्या नाण्यासारखे बनवा, जे नाल्यात पडले तरी त्याचे मूल्य कमी होत नाही."

## लक्षवेधी

### बिहारचे माजी मुख्यमंत्री कपूर्री ठाकूर यांना मरणोत्तर 'भारतरत्न', CM नितीश कुमार म्हणाले...

**नवी दिल्ली :** बिहारचे माजी मुख्यमंत्री आणि थोर समाजवादी नेते कपूर्री ठाकूर यांना मरणोत्तर देशाचा सर्वोच्च सन्मान 'भारतरत्न' देण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. या निर्णयावर मुख्यमंत्रीनितीश कुमार यांनी मनापासून आनंद व्यक्त केला. त्यांनी केंद्राचा हा निर्णय योग्य असल्याचे म्हटले.मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी जननायक कपुर्री ठाकूर यांना भारतरत्न दिल्याबद्दल आनंद व्यक्त केला. कपूर्री ठाकूर यांच्या 100व्या जयंतीनिमित्त हा सर्वोच्च सन्मान प्रदान करण्याच्या घोषणेमुळे दलित, वंचित आणि उपेक्षित घटकांमध्ये सकारात्मक भावना निर्माण होईल, असे मुख्यमंत्री म्हणाले. 'केंद्र सरकारने अगदी योग्य निर्णय घेतला आहे. जनता दल युनायटेडची अनेक वर्षांची मागणी आता पूर्ण झाली आहे,' अशी प्रतिक्रिया दिली.

### वंचित बहुजन आघाडी इंडिया आघाडीसोबत येणार का? काँग्रेसने दिले महत्त्वाचे संकेत

**नवी दिल्ली :** आगामी लोकसभा निवडणुकीसाठी सर्वच राजकीय पक्षांनी तयारीला सुरुवात केली आहे. भाजपविरोधात लढण्यासाठी इंडिया आघाडीचा भक्कम पर्याय उभा राहत आहे. या आघाडीत सर्व समविचारी पक्षांना एकत्र घेत भाजपला तगडे आव्हान देण्यात येणार आहे. लोकसभा निवडणुका तोंडावर आल्या असून काँग्रेस पक्ष या निवडणुकीसाठी तयार आहे. ब्लॉक स्तरापासून पक्ष संघटनेच्या तयारीचा आढावा घेतला जात आहे. वंचित बहुजन आघाडीला सोबत घेण्याची काँग्रेसची इच्छा असून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे आणि शरद पवार त्यांच्यासोबत चर्चा करत आहेत. महाराष्ट्रातील लोकसभेच्या सर्व जागा महाविकास आघाडीने एकत्र लढण्यावर एकमत झाले आहे.

### आसाममध्ये राहुल गांधींविरोधात एफआयआरचे आदेश, काँग्रेसने दिलं प्रत्युत्तर

**नवी दिल्ली :** काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या 'भारत जोड़ो न्याय यात्रे'दरम्यान आसाममधील जोराबाट इथं काँग्रेस कार्यकर्त्यांनी बॅरिकेड हटविण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्वा सरमा यांनी पोलिसांना राहुल गांधी यांच्या विरोधात एफआयआर दाखल करण्याची सूचना केली आहे. मंगळवारी (23 जानेवारी) सकाळी आसाम पोलिसांनी राहुल गांधी आणि काँग्रेस कार्यकर्त्यांना जोराबाटमधून पुढे जाण्यापासून रोखलं. पीटीआय वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार राहुल गांधींच्या यात्रेला गुवाहाटीमध्ये प्रवेश करण्यापासून रोखण्यासाठी हे बॅरिकेड लावण्यात आले होते. इथेच काही कार्यकर्ते पोलिसांच्या बॅरिकेड्सवर चढले.

### मालदीवची नवी खेळी, चिनी गुप्तहेर जहाजाला मालदीवच्या हद्दीत येण्याची परवानगी

**नवी दिल्ली :** भारताविरोधात नवे षडयंत्र रचले आहे. एकीकडे राष्ट्राध्यक्ष मोहम्मद मुइज्जू यांनी मालदीवमध्ये असलेल्या 77 भारतीय सैनिकांना परत पाठविण्याची तयारी सुरु केली आहे. भारताने आपल्या सैन्याला 15 फेब्रुवारीपर्यंत परत बोलवावे असा इशारा मोहम्मद मुइज्जू यांनी दिला आहे. तर, दुसरीकडे चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांना आपला जिवलग मित्र म्हणणाऱ्या मालदीवचे राष्ट्राध्यक्ष मुइज्जू यांनी चीनच्या गुप्तहेर जहाजाला मालदीवच्या हद्दीत येण्याची परवानगी दिली आहे. मालदीवचे राष्ट्राध्यक्ष मोहम्मद मुईझ यांनी भारताविरोधात पावले उचलली आहेत. राष्ट्राध्यक्ष झाल्यानंतर मुइज्जू यांनी मालदीवची परंपरा मोडली. मालदीवच्या राष्ट्राध्यक्षांनी भारतात न जाता चीनला भेट दिली होती.

### "मोदींनी खरंच उपवास धरला होता? मला संशय." काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्याने घेतली शंका

**नवी दिल्ली :** अयोध्येतील राम मंदिरामध्ये रामललांच्या मूर्तीचा प्राणप्रतिष्ठापना सोहळा सोमवारी उत्साहात साजरा झाला होता. या सोहळ्यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ११ दिवस कठीण अनुष्ठान करून उपवास केला होता. मोदींनी १२ ते १२ जानेवारीपर्यंत हा उपवास धरला होता. या काळात मोदींनी केवळ नारळ पाण्याचं सेवन केलं होतं. मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केलेल्या या उपवासावर आता काँग्रेसच्या एका ज्येष्ठ नेत्यांनी शंका घेतली आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री वीरप्पा मोईली यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केलेल्या उपवासावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

### आपण हळूहळू हिंदु राष्ट्राच्या दिशेने जात आहोत ! - मुसलमान पक्षकारांचे अधिवक्ता राजीव धवन

**नवी दिल्ली :** श्रीरामजन्मभूमीच्या न्यायालयीन खटल्यात सुन्नी वक्फ बोर्ड आणि इतर मुसलमान गट यांची बाजू मांडणारे ज्येष्ठ अधिवक्ता राजीव धवन यांनी एका इंग्रजी वृत्तवाहिनीला दिलेली मुलाखत नुकतीच प्रसिद्ध झाली. ते म्हणाले की, कुणीही मंदिराच्या विरोधात नाही; पण त्याच्या राजकीयीकरणाला आमचा विरोध आहे. आपण हळूहळू हिंदु राष्ट्र होण्याच्या दिशेने वाटचाल करत आहोत. धवन पुढे म्हणाले की, हे आपल्या राज्यघटनेच्या विरुद्ध आहे. आपण विविधता असणारा देश आहोत; पण या प्रकारचे राजकीयीकरण या विविधतेकडेच दुर्लक्ष करते. सरकारने मंदिराच्या कामात आर्थिक साहाय्य केले.

### जगन मोहन रेड्डींना धक्का, तिसऱ्या खासदाराने पक्ष सोडला; हे आहे एक्झिटचं कारण

**नवी दिल्ली :** आगामी लोकसभा निवडणुकांच्या आधी आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री आणि वाएसआरसीपीचे अध्यक्ष जगन मोहन रेड्डी यांना आणखी एक मोठा धक्का बसला आहे. कारण नरसरावपेट मतदारसंघातील खासदार लावू श्री कृष्ण देरायलु यांनी आपल्या खासदारकीसह वायएसआरसीपीच्या प्राथमिक सदस्यपदाचाही राजीनामा दिला आहे. लोकसभा निवडणुकांना काही महिने बाकी असताना एकाच महिन्यात तिसऱ्या खासदाराने पक्ष सोडल्याने जगन मोहन रेड्डी यांची डोकेदुखी वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. नरसरावपेट मतदारसंघातून वायएसआरसीपी यंदाच्या लोकसभा निवडणुकीत मागासवर्गीय उमेदवाराला संधी देण्याच्या विचारात आहे.

# मिरा रोडमध्ये 'योगी पॅटर्न', दंगलग्रस्त भागातील अनधिकृत बांधकामावर फिरला पालिकेचा 'बुलडोझर'





**■ठाणे। यश सावंत,**

मीरारोडच्या नया नगर भागात रविवारी रात्री भाईंदर मधून गेलेल्या लोकांनी तेथील धार्मिक स्थळाजवळ घोषणाबाजी केली होती. त्यावेळी जमावाने भाईंदरच्या लोकांवर हल्ला चढवला होता. त्यानंतर नया नगर भागात दोन गट आमने सामने येऊन दगडफेक झाली होती. तर शहरातील अन्य भागात देखील मारहाण, तोडफोडीच्या घटना घडल्या. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचा बुलडोझर पॅटर्न मीरारोडच्या नया नगर भागातील दंगलग्रस्त भागात राबवण्यात आला. मुंबईजवळील मिरा रोड परिसरातील नयानगर भागात दोन गटात हिंसाचाराची घटना घडली. या घटनेनंतर तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. या प्रकरणाची प्रशासनाने गंभीर दखल घेतली असून या विरोधात कडक कारवाई सुरू करण्यात आली आहे. मंगळवारी सायंकाळी मीरा भाईंदर महापालिकेने मोठ्या पोलीस बंदोबस्तात हैदरी चौक येथील एका इमारतीतील ८ दुकानांचे वाढीव अनधिकृत बांधकामे, तर जवळच असलेली आणखी ७ अनधिकृत दुकाने व २ शेड मधील गॅरेजवर जेसीबीने कारवाई करत अनधिकृत बांधकामे भुईसपाट करण्यात आली. या कारवाईच्या वेळी मोठा पोलीस बंदोबस्त ही ठेवण्यात आला होता. सदर बांधकामे व शेड पालिकेने भुईसपाट करून टाकली. उपायुक्त मारुती गायकवाड, अतिक्रमण विभाग प्रमुख नरेंद्र चव्हाण, प्रभाग अधिकारी स्वप्नील सावंत सह पालिकेचे अधिकारी - कर्मचारी यांनी सदर कारवाई केली. यावेळी पोलीस, महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान आदींचा मोठा बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

मंगळवारी सकाळपासूनच पालिकेने कारवाईची तयारी केली होती. संध्याकाळी ५ च्या सुमारास प्रचंड पोलीस बंदोबस्तात अतिक्रमण विरोदी कारवाई सुरू करण्यात आली. ही नियमित कारवाई असल्याचे उपायुक्त मारूती गायकवाड यांनी सांगितले. मात्र कालच्या घटनेच्या पार्श्वभूमीवरच ही कारवाई होत असल्याची चर्चा आहे. आमच्याकडे पालिकेने बंदोबस्त मागितला होता. तो आम्ही दिला असे पोलीस उपायुक्त (परिमंडळ१) जयंत बजबळे यांनी सांगितले.

**गृहमंत्र्यांनी दिले होते आदेश**

नया नगर भागात दोन गटात झालेल्या वादानंतर गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आरोपींवर कठोर कारवाई करण्याचे आणि परिसरातील अवैध बांधकामांवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. गृहमंत्र्यांनी आदेश दिल्यानंतर 48 तासातच पोलिसांनी ॲक्शन घेत नया नगर परिसरातील अवैध बांधकामांवर बुलडोझर फिरवण्यात आला.

**अफवांवर विश्वास ठेऊ नका**

दरम्यान, मीरारोडमधली परिस्थिती आता शांत असून लोकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेऊ नये असं आवाहन पोलिसांनी केलं आहे. सोशल मीडियावर अफवा पसरवणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाणार आहे. पुन्हा कोणताही तणाव निर्माण होऊ नये यासाठी पोलीस बंदोबस्तात वाढ करण्यात आली आहे.

## PM मोदींची शिवरायांशी तुलना? गोविंददेव गिरींच्या वक्तव्यावर संभाजीराजेंची प्रतिक्रिया



**■मुंबई। विशाल कारंडे,**

रामभक्तांचे पाचशे वर्षांचे स्वप्न साकार झाले. रामललांच्या मूर्तीची अयोध्येत उभारण्यात आलेल्या भव्यदिव्य राम मंदिरात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते प्राणप्रतिष्ठा झाली आणि संपूर्ण देशभरात जय श्रीरामचा जयघोष गुंजला. या सुवर्णक्षणाची भारतासह अवघे जग उत्सुकतेने वाट पाहत होते. या सोहळ्यावेळी श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांनी छत्रपती शिवाजी महाराजांची आठवण काढत पंतप्रधान मोदी यांचे कौतुक केले. यावरून आता प्रतिक्रिया येत असून, संभाजीराजे छत्रपती यांनी यावर भाष्य केले आहे.

एखादे परिवर्तन आणण्यासाठी एखाद्या महापुरुषाला स्वतःचे जीवन अपार्वे लागते. देशाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या रुपाने एक आदर्श व्यक्ती लाभली. छत्रपती शिवाजी महाराज स्वतः मल्लिकार्जुन ज्योतिलिंर्गाच्या दर्शनासाठी श्रीशैलम येथे गेले, तेव्हा त्यांनी तीन दिवसांचा उपवास केला. तीन दिवस शिवमंदिरात राहिले. मला राज्य करायचे नाही, असे छत्रपती शिवाजी महाराजांच्या मनात आले. पण ज्येष्ठ मंत्र्यांनी महाराजांची समजूत घातली आणि राज्य करणे ही त्यांची सेवाच आहे, असे सांगितले. समर्थ रामदास स्वामी यांचीही यावेळी आठवण होत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांबाबत गौरवोद्गार काढताना समर्थ रामदास स्वामी म्हणाले होते की, निश्चयाचा महामेरू। बहुत जनांसी आधारू । अखंड स्थितीचा निर्धारू। श्रीमंत योगी. आपल्याला असाच एक श्रीमंत योगी प्राप्त झाला आहे, असे स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांनी म्हटले होते.

## शिवछत्रपती पुरस्कारासाठी यादीतून वगळलेल्या खेळांचा पुन्हा समावेश; अजित पवारांचा निर्णय



**■मुंबई। दिगंबर जाधव,**

सुधारित शासन निर्णयात शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराकरिता पात्र क्रीडा प्रकारांच्या यादीतील 44 क्रीडा प्रकारांपैकी इक्वेस्टेरियन, गोल्फ, पॉवरलिफ्टींग, बॉडीबिल्डींग, कॅरम, बिलीयर्डस अँन्ड स्नूकर व यॉटींग या सात प्रकारांना वगळण्यात आले होते. या वगळण्यात आलेल्या क्रीडा प्रकारांसह जिम्नॅस्टिक खेळामधील उपप्रकार असणाऱ्या एरोबिक्स व ॲक्रोबॅटिक्स या क्रीडा प्रकारांचा पुन्हा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांच्या पात्र यादीत सामावेश करण्याचे निर्देश महाराष्ट्र ऑलिंम्पिक असोसिएशनचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. तसेच यंदाच्या (सन 2022-2023) पुरस्कारांसाठी फेरसमाविष्ट केलेल्या क्रीडा प्रकारातील अर्ज ऑनलाईन पध्दतीने तातडीने मागवून घेण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांसाठी पात्र क्रीडा प्रकारांच्या यादीतून वगळण्यात आलेल्या खेळांच्या संघटनांनी त्यांच्या खेळांचा समावेश करण्याबाबत क्रीडा संचालनालयास पत्रव्यवहार केला होता, त्या अनुषंगाने मंत्रालयात महाराष्ट्र ऑलिंम्पिक असोसिएशनचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

## 'या' अभियानात मुंबईला देशात 'नंबर वन' करण्याचे मुख्यमंत्री शिंदे यांचे टार्गेट; मुंबईकरांना केले आवाहन



**■मुंबई। नितीन देवळेकर,**

मुंबईबद्दल जगभरात आकर्षण असून येथे हे महानगर आपल्याला स्वच्छ, सुंदर, प्रदूषणमुक्त करायचे आहे. देशभरात महाराष्ट्र स्वच्छता अभियानात अग्रेसर असतांना येत्या काळात या अभियानात मुंबई देखील देशात प्रथम क्रमांकावर आणण्यासाठी प्रयत्न करायचे आहेत, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

यावेळी मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, डीप क्लिन ड्राईव्हला मुंबईकरांचा चांगला प्रतिसाद लाभत असून परिसर स्वच्छतेबाबत जनजागृती होत आहे. ही मोहिम मुंबईच्या प्रत्येक गल्ली आणि रस्त्यापर्यंत पोहचायला हवी. प्रत्येक रस्ता, गल्लीसह सार्वजनिक शौचालये नियमितपणे स्वच्छ व्हायला हवी. या मोहिमेचा परिणाम मुंबईच्या अंतर्गत भागात दिसायला हवा.

## तलाठी भरती घोटाळ्यावरून काँग्रेस आक्रमक, दादर स्थानकात लोकल अडवली, रेल्वेचा खोळंबा



**■मुंबई। प्रतिनिधी,**

गेल्या काही दिवसांपासून राज्यभरात गाजत असलेल्या तलाठी भरती घोटाळ्याच्या मुद्द्यावरून काँग्रेस पक्ष आक्रमक झाला आहे. युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी मंगळवारी दुपारी दादर रेल्वे स्थानकात रुळांवर उतरत लोकल ट्रेन रोखून धरली. युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभाग घेतला. तलाठी भरती घोटाळ्याची एसआयटी चौकशी करून घोटाळ्यामागील मास्टरमाईंड शोधा, अशी प्रमुख मागणी करत कार्यकर्त्यांनी प्रचंड घोषणाबाजी केली. यावेळी रूळांवर मोठ्या संख्येने काँग्रेस कार्यकर्ते उतरल्याने पश्चिम रेल्वे वाहतूक ठप्प झाली होती. संध्याकाळच्या सुमारास कार्यालयातून घरी जाणाऱ्या मुंबईकरांना या आंदोलनाचा फटका बसण्याची शक्यता आहे. या आंदोलनामुळे साधारण पुढील ४० ते ५० मिनिटे रेल्वे वाहतुकीचं वेळापत्रक कोलमडण्याची शक्यता आहे.

## मनोज जरांगेंच्या आंदोलनाला विरोध, गुणरत्न सदावर्तेंना हायकोटार्चे थेट निर्देश





**■मुंबई। विशाल पाटील,**

मराठा आंदोलनाविरोधात याचिका करणाऱ्या गुणरत्न सदवर्ते यांना दुसऱ्या खंडपीठाकडे दाद मागण्याचे निर्देश मुंबई हायकोटार्ने दिले आहेत. गुणरत्न सदावर्ते यांनी मनोज जरांगे यांच्या मुंबईतील आंदोलनाला विरोध करत याचिका दाखल केली आहे. त्यावर कोटार्ने सदावर्तेंना दुसऱ्या खंडपीठात जाण्याचे निर्देश दिले.

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे हे मुंबईच्या दिशेने निघाले आहेत. मात्र सदावर्ते यांनी जरांगेंच्या मुंबईतील आंदोलनाला विरोध करत हायकोर्टात याचिका दाखल केली आहे. जरांगेंच्या प्रस्तावित आंदोलनाविरोधातील याचिकेवर सुनावणीस हायकोटार्तील मूळ खंडपीठाने नकार दिला. न्यायमूर्ती रेवती मोहिते-डेरे यांच्या खंडपीठानं प्रकरण न्यायमूर्ती अजय गडकरी यांच्या खंडपीठाकडे सुनावणीसाठी वर्ग केलं. काही कारणास्तव या याचिकेवरील सुनावणीस न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने नकार दिला. त्यामुळे आता गुणरत्न सदावर्तेंना दुसऱ्या खंडपीठात दाद मागावी लागणार आहे.

## धार्मिक तेढ निर्माण केल्याप्रकरणी मुंबईत सहा गुन्हे दाखल




**■मुंबई। भावना जैन,**

धार्मिक तेढ निर्माण केल्याप्रकरणी मुंबईत सोमवारी सहा गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. वाकोला, गोवंडी, भोईवाडा, व्ही. पी. मार्ग, मालवणी व ओशिवरा पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले असून याप्रकरणी तिघांना अटक करण्यात आली. दरम्यान, शहरात कोणतीही गंभीर घटना घडलेली नसून बहुसंख्य ठिकाणी झेंडे लावण्यावरून वाद झाल्याचे अधिकाऱ्याने सांगितले.सांताक्रुझ पूर्व येथे धार्मिक झेंड्याचा अपमान केल्याप्रकरणी वाकोला पोलिसांकडे तक्रार करण्यात आली होती. जमावाने स्वतः पकडून आरोपीला पोलीस ठाण्यात आणले.

त्यानुसार धार्मिक तेढ निर्माण केल्याप्रकरणी वाकोला पोलिसांनी २६ वर्षीय कपडे शिवण्याचा व्यवसाय करणाऱ्या तरूणाला अटक केली. सिगारेट पिताना हटकले असता आरोपीने तेथील झेंडे काढून फेकून देण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे. गोवंडी येथे दुसऱ्या घटनेत व्हॉट्स ॲपवर धार्मिक भावना दुखावेल अशी पोस्ट केल्याप्रकरणी २३ वर्षीय तरूणाला अटक करण्यात आली. वसतिगृहात राहणाऱ्या २३ वर्षीय विद्यार्थ्याने ही पोस्ट पाहिल्यानंतर गोवंडी पोलिसांकडे तक्रार केली होती. तिसऱ्या घटनेत धार्मिक झेंडे काढून धार्मिक भावना दुखावल्याप्रकरणी भोईवाडा पोलसांनी गुन्हा दाखल केला. याप्रकरणी ५५ वर्षीय व्यक्तीला अटक करण्यात आली. चौथ्या घटनेमध्ये मालवणी येथेही झेंडे काढल्याच्या आरोपाखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पाचव्या घटनेत अंधेरी येथे दुचाकी व मोटरगाड्यांना झेंडे लावून रॅली काढण्यात आली होती. त्यावेळी या रॅलीच्या मागे असलेल्या मोटरगाडीवर दगडफेक करण्यात आल्याची तक्रार ओशिवरा पोलिसांकडे करण्यात आली आहे.

## प्रजासत्ताक दिन संचलनचे देशभरातील हे २५० जण जोडीदारासह उपस्थित राहणार विशेष पाहुणे



**■नवी दिल्ली। प्रगती शर्मा,**

देशभरातल्या २४ राज्ये आणि २ केंद्रशासित प्रदेशांमधल्या सुमारे २५० प्राथमिक कृषी पत समित्यांचे (पीएसीएस) प्रमुख आणि त्यांचे जोडीदार कर्तव्य पथावर होणाऱ्या प्रजासत्ताक दिन संचलन २०२४ साठी विशेष पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. सहकार मंत्रालय, संरक्षण मंत्रालयाच्या सहकार्याने विशेष अतिथींचे आदरातिथ्य करणार आहे. सहकारातून समृद्धी' ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी सहकार मंत्रालयाने, केंद्रीय गृहमंत्री आणि सहकार मंत्री अमित शाह यांच्या नेतृत्वाखाली अल्प कालावधीत ५४ हून अधिक उपक्रम हाती घेतले आहेत. पीएसीएसचे संगणकीकरण हे मंत्रालयाच्या महत्त्वाच्या उपक्रमांपैकी एक असून या अंतर्गत २५१६ कोटी रुपयांच्या तरतुदीसह ६३ हजार पीएसीएसचे संगणकीकरण केले जात आहे. आतापर्यंत २८ राज्ये/ केंद्रशासित प्रदेशातल्या १२ हजाराहून अधिक पीएसीएसचे संगणकीकरण झाले असून त्या राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँकेद्वारे (नाबार्ड) विकसित ईआरपी (एंटरप्राइज रिसोर्स प्लानिंग) सॉफ्टवेअरवर आणण्यात आल्या आहेत.

## लोकसभा निवडणुकीसाठी आता सहकारी सोसायट्यांमध्येही मतदान केंद्र, निवडणूक आयोगाच्या सूचना

**■पुणे। अभिजित येरल्लू,**

आगामी लोकसभा निवडणुकांसाठी आता शहरातील सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांमध्येदेखील मतदान केंद्रे सुरू करण्यात येणार आहेत. शहरी मतदारांमध्ये मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी हा निर्णय घेतल्याचं सांगण्यात आलंय. ज्या गृहनिर्माण सोसायटीत मतदान केंद्र तयार करण्यात येणार आहेत, त्या सोसायटीतील रहिवाशांबरोबरच त्या सोसायटीच्या बाहेरच्या नागरिकांना देखील त्या ठिकाणी मतदान करण्यासाठी जावं लागणार आहे.


महाराष्ट्रातील या शहरांमध्ये सोसायट्यांमध्ये मतदान केंद्र - महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड या मोठ्या प्रमाणात शहरीकरण झालेल्या जिल्ह्यांमधे अशी मतदान केंद्रे तयार करण्याच्या सूचना निवडणूक आयोगाने दिल्या आहेत. त्यानंतर पुण्यातील 36 गृहनिर्माण सोसायट्यांमध्या आगामी लोकसभा निवडणुकीसाठी मतदान केंद्र तयार करण्याचं निश्चित करण्यात आलं आहे. या आधीच्या निवडणुकांमध्ये निवडणूक आयोगाने निर्धारित केलेल्या मतदान केंद्रांवरच मतदान करता येत होतं. निवडणूक आयोगाच्या या ताज्या निर्णयानंतर आता मात्र शहरातील गृहनिर्माण सहकारी सोसायट्यांमध्येही मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे.



# हवेची गुणवत्ता सुधारली, मात्र ध्वनी प्रदुषणाने ठाणेकर हैराण

■ठाणे। प्रतिनिधी,
ठाणे महापालिकेच्या माध्यमातून प्रदुषण रोखण्यासाठी विविध प्रकारच्या उपाय योजना केल्या जात आहेत. परंतु तरी देखील शहरातील प्रदुषणाची स्थिती ही वरखाली राहिल्याचे दिसून आले आहे. त्यात शहरात वाहनांची वाढत असलेली संख्या, मेट्रोच्या सुरु असलेल्या कामांमुळे आणि नव्याने होणाऱ्या बांधकामांमुळे ठाण्यातील हवेतील प्रदुषणात मागील वर्षीच्या तुलनेत घट झाल्याचे चित्र आहे.

महापालिकेच्या पर्यावरण अहवालात शहरातील निवासी क्षेत्राची हवा ही मध्यम, व्यावसायिक आणि औद्योगिक क्षेत्राची हवा समाधानकारक असल्याचे चित्र दिसून आले आहे. तर विविध २० चौकापैकी केवळ कोपरी प्रभाग समितीमध्ये हवा ही प्रदुषित गटात मोडली गेली आहे. तर पाणी विभागाद्वारे होणाऱ्या वितरण प्रणालीच्या पाण्याचे नमुन्याची गुणवत्ता मागील वर्षीपेक्षा २ टक्यांनी घसरल्याचे चित्र आहे.



एकीकडे हवेतील प्रदुषणात घट होत असतांना दुसरीकडे ध्वनी प्रदुषणात मात्र वाढ झाल्याचे पर्यावरण अहवालात नमुद करण्यात आले आहे. तर शांतता क्षेत्रातही ध्वनी प्रदुषणाची पातळी वाढल्याचे दिसून आले आहे. त्यातही सणांच्या काळात होणारे प्रदुषण हे अधिक असल्याचे वारंवार नमुद करण्यात आले असून त्यावर केवळ कागदी घोडे नाचविण्यात पालिका धन्यता मानत आहे. ठाणे महापालिका हद्दीत मागील वर्षीच्या तुलेत यंदा देखील वाहनांच्या संख्येत ८ ते १० टक्के वाढ झाल्याचे दिसून आले आहे. त्यात दुचाकींची संख्या ही ७० हजार ८३२ एवढी आहे. तर मागील काही वर्षात इलेक्ट्रीक वाहनांची संख्या वाढतांना दिसत आहे. त्यानुसार मागील वर्षी ४६५२ इलेक्ट्रीक वाहने घेतली गेली आहेत. त्यात रस्त्यावर होणाऱ्या वाहतुक कोंडीमुळे, विनाकारण हॉर्न वाजविल्यामुळे, बांधकामांची सुरु असलेली कामे, सण उत्सवात मोठ्या आवाजात वाजणारे डीजे आदींमुळे ध्वनी प्रदुणषात वाढ होत असल्याचा निर्ष्कष पर्यावरण अहवालात मांडण्यात आला आहे. महापालिकेने शहरातील २० चौकांचे सर्व्हेक्षण केले असता, त्याठिकाणी ध्वनी प्रदुषणात वाढ झाल्याचे दिसून आले आहे. याशिवाय दिपावली आणि गणेशोत्सवाच्या काळात देखील ध्वनीची तीव्रता ही डेसीबल पेक्षाही अधिक आढळून आली आहे. मात्र मागील वर्षीच्या तुलनेत ध्वनी पातळीत २१ टक्यांनी घट झाल्याचे दिसून आले आहे. तर शहरातील शांतता क्षेत्रातही ध्वनी प्रदुषणात कमालीची वाढ झाल्याचे नमुद करण्यात आले आहे.

हवेची गुणवत्ता सुधारली

महापालिकेने केलेले शहरातील काही परिसराचे हवेची गुणवत्ता तपासली. या ठिकाणी हवेची गुणवत्ता मागील वर्षीच्या तुलनेत काही प्रमाणात सुधारल्याचे समाधानकारक चित्र दिसत आहे.

हवेची गुणवत्ता तपासण्यासाठी महापालिकेच्या माध्यमातून शहरातील २० चौकांचे सर्व्हेक्षण करण्यात आले होते. त्यानुसार मागील वर्षीच्या तुलनेत हवेच्या गुणवत्तेत सुधारणा झाल्याचे दिसून आले आहे. मागील वर्षी किसन नगर चौकातील हवेची गुणवत्ता २३९ एवढी होती. यंदा ती १३७ पर्यंत सुधारली आहे. तर कॅडबरी नाका, नितीन कंपनी, मुलुंड चेकनाका, बाळकुम नाका, गावदेवी नाका, कापुरबावडी नाका, रेतीबंदर, शिळफाटा, कल्याणफाटा या भागातील हेवेची गुणवत्ता देखील मागील वर्षीच्या तुलनेत बऱ्याच अंशी सुधारली आहे.

मात्र कोपरी प्रभाग समिती क्षेत्रात मागील वर्षी १३७ एवढी होती. यंदा मात्र त्याठिकाणी हवेची गुणवत्ता २०६ एवढी म्हणजेच प्रदुषित आढळ्ली आहे. तर उपवन बसडेपो येथील हवा देखील मध्यम प्रदुषित गटात मोडली आहे.

महापालिकेच्या माध्यमातून हवा प्रदुषण रोखण्यासाठी केलेल्या विविध उपाय योजनांमुळे हवेची गुणवत्ता सुधारल्याचे समाधानकारक चित्र दिसत आहे.

साठवणुकीच्या पाण्याची गुणवत्ता देखील तपासण्यात आली असून त्यानुसार २७ हजार ७९६ नमुने तपासण्यात आले असून त्यातील ८४ टक्के नमुने हे पिण्यायोग्य आढळले असून १६ टक्के नमुने पिण्यास अयोग्य असल्याचे स्पष्ट झाले आहे. तर वितरण प्रणालीद्वारे पाण्याचे १३ हजार २४ नमुने तपासण्यात आले असून त्यातील १२ हजार ९९ नमुने हे पिण्यायोग्य आढळले आहे.

## मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या भेटीनंतर विकास म्हात्रे यांनी राजीनामा घेतला मागे



■डोंबिवली। प्रतिनिधी,
डोंबिवली पश्चिमेतील भाजपचे माजी नगरसेवक विकास म्हात्रे यांनी आपल्या पत्नी आणि कार्यकर्त्यांसह भाजप सदस्यत्वाचा राजीनामा गेल्या आठवड्यात दिला होता. नाराज म्हात्रे शिवसेना शिंदे गटाच्या वाटेवर असल्याची चर्चा सुरू असतानाच सोमवारी संध्याकाळी सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी विकास म्हात्रे यांची भेट घेतली. या भेटीनंतर विकास म्हात्रे राजीनामा मागे घेत भाजपसाठी जोमाने काम करण्याचे आश्वासन मंत्री चव्हाण यांना दिले. गेल्या मंगळवारी (ता. १६) विकास म्हात्रे, पत्नी कविता आणि त्यांच्या भाजप कार्यकर्त्यांनी भाजपच्या सदस्यत्वाचा राजीनामा डोंबिवली पश्चिम मंडलाचे अध्यक्ष समीर चिटणीस यांच्याकडे दिला होता. यामुळे भाजप गोटात खळबळ उडाली होती.

केंद्रात, राज्यात भाजपचे सरकार असताना आपल्या राजूनगर, गरीबाचापाडा प्रभागात रस्ते, गटार इतर विकास कामे होत नसल्याने नागरिक नाराज आहेत. नागरिकांच्या रोषाला आपणास सामोरे जावे लागते. इतर प्रभागांमध्ये मात्र विकास कामांसाठी अधिकचा निधी उपलब्ध होत आहे. मग आपल्याच प्रभागांवर अन्याय का, असे प्रश्न म्हात्रे यांनी राजीनामा देताना उपस्थित केले होते.

## डोंबिवलीत व्यापारी गाळ्यावरून भाजप ग्रामीण महिला अध्यक्षा सुहासिनी राणे यांना मारहाण

■डोंबिवली। प्रतिनिधी,
आमची मालकी असताना आम्हाला न विचारता व्यापारी गाळा का उघडला, असा प्रश्न करून डोंबिवली पूर्वेतील पी ॲन्ड टी कॉलनी येथे पाच जणांनी भाजपच्या एक महिला पदाधिकारी आणि त्यांच्या मुलाला बेदम मारहाण केली आहे. या मारहाणीत आरोपींनी महिलेचा विनयभंग केला. यावेळी झालेल्या झटापटीत महिलेच्या हातामधील सोन्याच्या अंगठ्या गहाळ झाल्या आहेत. आरोपींच्या मारहाणीत यश सुरेश राणे (२७), त्याची आई भाजपच्या महिला ग्रामीण आघाडीच्या अध्यक्षा सुहासिनी राणे जखमी झाल्या आहेत. दिलीप चांगो म्हात्रे, प्रणव दिलीप म्हात्रे, आशीष दिलीप म्हात्रे, गणेश तिवारी आणि त्यांचा अन्य एक साथीदार या आरोपींनी ही मारहाण केली आहे.



मानपाडा पोलीस ठाण्यात यश राणे यांनी तक्रार केली आहे. पोलिसांनी सांगितले, यश राणे याचे डोंबिवलीतील पी ॲन्ड टी कॉलनीत दिलीप म्हात्रे यांच्या इमारतीत तळ मजल्याला व्यापारी गाळ्यामध्ये मोटार दुरुस्तीचे गॅरेज आहे. विजय सोनी, अब्दुल अन्सारी या कामगारांच्या साह्याने यश हे गॅरेज चालवितो. ११ महिन्यांच्या करार पत्राने मागील तीन वर्षापासून यश या गाळ्यात वाहन दुरुस्तीचा व्यवसाय करतो. प्रणव म्हात्रे याच्या बरोबर केलेल्या या कराराची मुदत गेल्या वर्षी संपली होती. तरी या गाळ्याचे भाडे समझोत्याने यश राणे गाळा मालक दिलीप यांना देत होता. यश यांचा गाळा रस्ता रूंदीकरणात बाधित होत असल्याने मालक दिलीप यांचा मुलगा प्रणव म्हात्रे याने यशला गाळा खाली करण्यास सांगितले होते.


त्याप्रमाणे यशने साथीदारांच्या साहाय्याने गाळ्यातून काही सामान काढून घेतले होते. उर्वरित सामान आतमध्ये असल्याने त्याने गाळ्याला कुलूप लावून ठेवले होते. त्याचवेळी मालकाने या गाळ्याला स्वतःचे कुलूप लावले होते. उर्वरित सामान बाहेर काढण्यासाठी शनिवारी रात्री यश राणे साथीदारांसह पी ॲन्ड टी कॉलनीत गेला होता. त्याने मालकाला न विचारता गाळ्याचे कुलूप तोडून शटर उघडून आत प्रवेश केला. त्यावेळी मालक प्रणव म्हात्रे याने यशला तू आम्हाला न विचारता गाळा का उघडला, असे प्रश्न करून प्रणवने त्याच्या आरोपी साथीदारांना घटनास्थळी बोलविले. त्यांनी यशला बेदम मारहाण केली.

## जरांगे पाटील यांच्या दिंडी मोर्चासाठी मराठा संघटनांची नवी मुंबईत जय्यत तयारी



■ नवी मुंबई। प्रतिनिधी,
मराठा आरक्षण मागणीसाठी मनोज जरांगे यांनी काढलेला दिंडी मोर्चा मुंबईत २६ जानेवारीला धडकणार असून २५ तारखेला मुंबई पूर्वी शेवटचा मुक्काम नवी मुंबईत असणार आहे. यासाठी नवी मुंबई समन्वयकांनी जोरदार तयारी सुरु केली असून किमान दोन ते अडीच कोटी लोकांचा जनसागर येईल अशी माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली. मनोज जरांगे यांच्या नेतृत्वाखाली २० जानेवारी पासून सुरु झालेल्या पायी मराठा आरक्षण मागणीसाठी काढण्यात आलेल्या दिंडीचा मुक्काम २५ तारखेला नवी मुंबई शहरात होणार आहे. यासाठी नियोजनच्या तयारीसाठी मराठा क्रांती मोर्चा, नवी मुंबई मध्यवर्ती कार्यालय बनवण्यात आले आहे. २५ जानेवारीला नवी मुंबई करोडोच्या संख्येने मराठा समाज नवी मुंबईत दाखल होणार आहे. त्यांच्या राहण्याची, खाण्याची तसेच पाण्याची, शौचालय व्यवस्थेबाबत नवी मुंबई मनपा आणि सिडकोला विनंती करण्यात आली आहे. या दिवशीकांदा बटाटा मार्केट बंद असणार आहे. तर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या इतर बाजार बाबत मार्केट मधील मुक्कामाबाबत माथाडी कामगार संघटना, व्यापारी, मार्केट प्रशासनासोबत नवी मुंबई मराठा क्रांती मोर्चा शिष्टमंडळाने बैठक तसेच पत्रव्यवहार केला आहे. तसेच महिलांच्या साठी सिडको प्रदर्शनी केंद्रात सोय करावी अशी मागणी सिडको कडे करण्यात आली आहे.

## कल्याणमध्ये धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या तरूणाविरूध्द गुन्हा




■कल्याण। प्रतिनिधी,
येथील बारावे गावातील एका तरूणाने प्रभू रामचंद्रांवर तयार करण्यात आलेल्या गाण्यात छेडछाड करून त्यामध्ये दोन समाजात धार्मिक तेढ-तणाव निर्माण होईल असे शब्द टाकले. हे गाणे समाज माध्यमांवर प्रसारित करून स्वताच्या मोबाईलच्या कोनात स्थापित केले होते. याविषयी सोमवारी तक्रार दाखल होताच खडकपाडा पोलिसांनी संबंधित तरूणा विरूध्द गुन्हा दाखल केला आहे. शाहनवाज मोहम्मद शब्बीर शेख उर्फ शानू शेख (३१) असे गुन्हा दाखल तरूणाचे नाव आहे. कल्याण पश्चिमेतील बारावे गावातील शिवपाडा येथील तो रहिवासी आहे. या प्रकरणी बारावे गावातील रहिवासी श्याम मिरकुटे यांनी खडकपाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी सांगितले, तक्रारदार श्याम मिरकुटे आणि त्यांचे मित्र गणेश सारंग, अनंत देशपांडे, आदेश जोशी गोदरेज पार्क भागात सार्वजनिक ठिकाणी उभे होते. त्यावेळी आदेश जोशी यांना त्यांच्या मोबाईलमध्ये दोन समाजात तणाव निर्माण होईल अशी दृश्यध्वनी चित्रफित अन्य एका इसमाने पाठविली होती. ही चित्रफित दोन समाजात तेढ निर्माण करणारी असल्याने मिरकुटे आणि त्यांच्या मित्रांनी ही माहिती तातडीने खडकपाडा पोलिसांना दिली. पोलिसांनी तक्रारीच्या अनुषंगाने तपासणी केली.

## डोंबिवली जवळील विकासकाच्या हत्येप्रकरणी चार जणांना जन्मठेप



■कल्याण। प्रतिनिधी,
डोंबिवली जवळील दावडी गावातील एका विकासकाची नऊ वर्षापूर्वी पैशाच्या वादातून चार जणांनी हत्या केली होती. या प्रकरणातील चार जणांना कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयाचे अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश पी. आर. अस्तुरकर यांनी जन्मठेपेची आणि १४ हजार रुपए दंडाची शिक्षा ठोठावली. गणेश मनिया चव्हाण (३६) असे हत्या झालेल्या विकासकाचे नाव आहे. ते बांधकाम व्यावसायिक होते. जन्मठेपेची शिक्षा झालेल्यांमध्ये दत्तू गोपाळ पवार (४०), स्वप्निल उत्तम पडवळ (३४) आणि कुमार भिमसिंग चव्हाण (४२), संतोष भिमसिंग चव्हाण (३४) या दोन सख्ख्या भावांचा समावेश आहे. अन्य आरोपींमध्ये एका रिक्षा चालकाचा समावेश होता. परंतु, न्यायालयाने उलटतपासणीच्या वेळी तपासातील काही त्रृटींची दखल घेऊन रिक्षा चालकाची निर्दोष मुक्तता केली. या हत्या प्रकरणात एकूण सात आरोपी होते. एक जण खून झाल्यानंतर फरार झाला. दुसरा तात्पुरत्या जामिनावर बाहेर होता. तोही नंतर बेपत्ता झाला. त्यामुळे हे दोन्ही आरोपी सुटकेपासून तात्पुरते बचावले आहेत. फरार दोन्ही आरोपींचा पोलीस शोध घेत आहेत.

अतिरिक्त सरकारी वकील ॲड. कदम्बिनी खंडागळे यांनी सांगितले, विकासक गणेश चव्हाण यांनी आरोपी संतोष चव्हाण यांना दोन लाख रुपए उसने दिले होते. आपले पैसे परत द्यावेत म्हणून विकासक चव्हाण आरोपी संतोष यांच्याकडे तगादा लावत होते.

## महापालिका करणार भटक्या श्वानांचे लसीकरण; पहिल्या वर्षी पाच हजार कुत्र्यांचे केले जाणार लसीकरण

■ठाणे। प्रतिनिधी,
कुत्रा चावल्यावर रॅबीज होऊ नये या उद्देशाने आता ठाणे महापालिकेच्या माध्यमातून भटक्या कुत्र्यांचे लसीकरण करण्याची मोहीम हाती घेण्यात येणार आहे. हे लसीकरण मोफत केले जाणार असून केंद्राच्या संस्थेच्या माध्यमातून सध्या शहरातील भटक्या कुत्र्यांचा सर्व्हे सुरु झाला आहे. त्यानुसार एका वर्षात पाच हजार भटक्या श्वानांचे लसीकरण केले जाणार आहे. पुढील पाच वर्षे ही मोहीम सुरु राहणार असल्याची माहिती महापालिकेच्या आरोग्य विभागाने दिली. लसीकरणाचा खर्च हा केंद्राच्या संस्थेमार्फत केला जाणार असल्याने त्याचा भार महापालिकेवर पडणार नसल्याचेही सांगितले जात आहे.



ठाणे महापालिका हद्दीत आजच्या घडीला २५ हजाराहून अधिक भटके श्वान असल्याची माहिती दिली जात आहे. तर मागील वर्षी ७ हजाराहून अधिक भटक्या कुत्र्यांचे निर्बिजीकरण केले गेले आहे. तर महापालिका हद्दीत भटक्या श्वानांची दहशत मागील काही वर्षात वाढल्याचे चित्र आहे. जानेवारी ते डिसेंबर २०२३ या कालावधीत १३ हजाराहून अधिक जणांना भटक्या कुत्र्यांच्या श्वान दंशाला सामोरे जावे लागले होते. आजही भटक्या कुत्र्यांची दहशत शहरात दिसून येत आहे. पालिकेने आता प्रभाग समितीनिहाय श्वानांची गणना सुरू केली आहे. कळवा परिसरापासून श्वान गणनेचे काम सुरू करण्यात आलेले असून त्यानंतर पालिकेच्या इतर भागात टप्प्याटप्प्याने श्वान गणना करण्यात येणार आहे.

यानंतर २६ फेब्रुवारी ते १ मार्च या कालावधीत रेबीज लसीकरण मोहिम राबविली जाणार आहे. यात पाच हजार भटक्या श्वानांचे लसीकरण करण्यात येणार आहे. देशभरातील भटक्या श्वानांच्या रेबीज निर्मुलनासाठी केंद्र सरकारकडून उपक्रम राबविण्यात येत आहे.

## कल्याणमधील दुर्गाडी किल्ल्याजवळ दुचाकी स्वारांवर दगडफेक

■कल्याण। प्रतिनिधी,
रामोत्सवाचा आनंद साजरा करत कल्याण मधील २० जणांनी शहरात दुचाकींवरून फेरी काढली होती. ही फेरी दुर्गाडी किल्ल्या जवळील गोविंदवाडी बाह्यवळण रस्त्या जवळील पुलावर गेल्यावर तेथे अज्ञात इसमांनी दोन दगड दुचाकी स्वारांच्या दिशेने भिरकावले. यामध्ये एका दुचाकीचे नुकसान झाले आहे, अशी तक्रार एका दुचाकी स्वाराने बाजारपेठ पोलीस ठाण्यात केली आहे. गोविंदवाडी पुलाखाली एक अज्ञात जमाव होता. त्यामधील एका इसमाच्या हातात धारदार शस्त्र होते. हा इसम संतप्त झाला होता. त्याला इतर जमाव रोखून धरत होता, असेही बाजारपेठ पोलीस ठाण्यात दयाप्रभू शेंडकर (२४), बबलू यादव यांनी दाखल केलेल्या तक्रारीत म्हटले आहे.




पोलिसांनी सांगितले, तक्रारदार दयाप्रभू शेंडकर, त्याचा मित्र भावेश शिंदे, बबलू यादव हे सोमवारी २० दुचाकींच्या समुहाने दुगार्डी किल्ल्या जवळील गोविंदवाडी बाह्यवळण पुलाजवळून जात होते. त्यावेळी पुलाखालून अज्ञात इसमांनी जोराने दोन दगड फिरकावले. एक दगड तक्रारदाराच्या दुचाकीच्या पुढे, एक दगड दुचाकीच्या पाठीमागील बाजुला पडला. पाठीमागील दगडाने दुचाकीची वाहन क्रमांकाची पट्टी तुटली आहे. दुचाकीवरील तक्रारदार आणि त्याचा मित्र सुदैवाने दगडफेकीतून बचावले.

बबलू यादव याने पुलाखाली पाहिले तर एक जमाव तेथे जमला होता. त्यामधील एकाकडे धारदार शस्त्र होते. तो इसम संतप्त झाला होता. त्याला इतर लोक रोखून धरत होते. ४० वषार्चा हा इसम होता. असे तक्रारीत म्हटले आहे. बाजारपेठ पोलीस ठाण्यात याप्रकरणी तक्रार करण्यात आली आहे. पोलीस या प्रकरणाचा तपास करीत आहेत.

## जलतरणपटू मानव मोरे व आयुष तावडे करणार सलग २४ तास पोहण्याचा विक्रमी थरार

■ठाणे। प्रतिनिधी,
देशाचे अमृतमहोत्सवी वर्ष, प्रजासत्ताक दिन व धर्मवीर आनंद दिघे यांच्या जयंतीनिमित्त सलग २४ तास पोहण्याचा विक्रम करुन त्यांना अनोखी सलामी देणार आहेत. महापालिकेच्या कै. मारोतराव शिंदे तरणतलाव येथे स्टारफिश स्पोटर्स फाऊंडेशनच्यावतीने या मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवार २६ जानेवारी रोजी दुपारी १२ वा. मानव मोरे व आयुष तावडे हे दोन जलतरणपटू सलग २४ तास जलतरण करण्याच्या विक्रमी मोहिमेची सुरूवात करणार आहेत. मानवने राज्य, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविला आहे तर आयुषने राज्य व राष्ट्रीय स्पर्धामध्ये चमकदार कामगिरी केली आहे. तसेच सिंधुदुर्ग, विजयदुर्ग येथे होणाऱ्या सागरी जलतरण स्पर्धांमध्ये सहभाग घेवून त्या यशस्वी केल्या आहेत. हे दोन्ही जलतरणपटू प्रशिक्षक कैलास आखाडे यांच्या मार्गदर्शनाली जलतरणाचा सराव करीत आहे. या जलतरणपटूंना शुभेच्छा देण्यासाठी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार असल्याचे निमंत्रक व महाराष्ट्र राज्य हौशी जलतरण संघटनेचे उपाध्यक्ष राजेश मोरे यांनी नमूद केले आहे.



## ठाण्यात दुरुस्ती कामानंतर पाणी टंचाई

■मुंबई। प्रतिनिधी,
ठाणे : ठाणे महापालिकेची स्वतःची योजना आणि स्टेम प्राधिकरणाकडून ठाणे शहराला होणारा पाणी पुरवठा जलवाहिनी दुरुस्ती कामामुळे शुक्रवारी २४ तासांसाठी बंद ठेवण्यात आला होता. शनिवारी दोन्ही स्त्रोतांकडून पाणी पुरवठा सुरू झाला असला तरी तो कमी दाबाने होत आहे. यामुळे ठाणे, घोडबंदर भागातील रहिवाशांना सोमवारीही पाणी टंचाईचा सामना करावा लागला. दरम्यान, शहरातील पाणी टंचाईची समस्या दूर करण्यासाठी स्टेम प्राधिकरणाकडून अतिरिक्त पाणी घेण्याचा निर्णय पालिकेने घेतला आहे. ठाणे महापालिका क्षेत्रात चार स्त्रोतांमार्फत दररोज ५८५ दशलक्षलीटर इतका पाणी पुरवठा करण्यात येतो. त्यात महापालिकेच्या स्वतःच्या योजनेतून २५० दशलक्षलीटर, स्टेम प्राधिकरणाकडून ११५ दशलक्षलीटर, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून १३५ दशलक्षलीटर आणि मुंबई महापालिकेकडून ८५ दशलक्षलीटर इतका पाणी पुरवठा करण्यात येतो. त्यामुळे हे सर्वच स्त्रोत शहरातील पाणी पुरवठ्याच्या दृष्टीकोनातून महत्वाचे मानले जातात. त्यापैकी स्टेम आणि महापालिका योजनेतून होणारा पाणी पुरवठा जलवाहीनी दुरुस्तीकामामुळे शुक्रवारी चोवीस तासांसाठी बंद ठेवण्यात आला होता. यामुळे घोडबंदर रोड, लोकमान्यनगर, वर्तकनगर, साकेत, ऋतुपार्क, जेल, गांधीनगर, रुस्तमजी, सिध्दांचल, इंदिरानगर, रुपादेवी, श्रीनगर, समतानगर, सिद्धेश्वर, इटर्निटी, जॉन्सन, मुंब्रा व कळव्याच्या काही भागाचा पाणी पुरवठा बंद ठेवण्यात आला होता. शहरात ३६५ दशलक्षलीटर इतकी पाणी कपात होऊन प्रत्यक्षात २२० दशलक्ष लीटर इतकाच पाणी पुरवठा झाला. तर, गुरूवारी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या पाणीपुरवठा योजनेतील पाणी पुरवठा जलवाहीनी दुरुस्तीसाठी बंद ठेवण्यात आला होता. या पाणी बंदमुळे शहरात ठिकठिकाणी पाणी टंचाईची समस्या निर्माण झाली. शनीवारी तिन्ही स्त्रोतांकडून पाणी पुरवठा सुरू झाला. पण, तो कमी दाबाने झाल्याने टंचाईची समस्या सोमवारपर्यंत कायम होती. पाणी बंदच्या काळात गृहसंकुलातील साठवणुक टाकीतील पाण्याचे नियोजन करून त्याचा सदनिकांमधील रहिवाशांना पुरवठा करण्यात आला.



## नेताजींचे विचार अमलात आणले तरच देश प्रगतिपथावर धावेल

■नवी मुंबई। प्रतिनिधी,
नेताजी सुभाषचंद्र बोस यांची १२७ वी जयंती वाशी येथील नेताजी सुभाषचंद्र बोस स्मृती संस्थानतर्फे मंगळवारी मोठ्या थाटामाटात साजरी करण्यात आली. सर्वप्रथम वाशी सेक्टर १७ येथील नेताजी सुभाषचंद्र बोस या चौकात सहायक पोलीस निरीक्षक (वाहतूक विभाग) योगेश गायकवाड यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून नेताजींना आदरांजली वाहण्यात आली.

यानंतर संस्थेच्या कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात उपस्थित सर्वच वक्त्यांनी नेताजींचे विचार अमलात आणले तर भारत खऱ्या अथार्ने प्रगतीच्या मार्गावर धावेल, असे विचार व्यक्त केले. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलतांना उत्तर भारतीय नेते, अभिनेते व माजी सैनिक एस. सी. मिश्रा म्हणाले की, आजचा युवक या आधुनिक युगात राष्ट्रासाठी समर्पित देशभक्तांना विसरत चालला असून, याचा विचार करण्याची गरज आहे. देशभक्तीची भावना देशातील प्रत्येक नागरिकामध्ये असली पाहिजे, तरच देश प्रगती आणि विकासाच्या मार्गावर राहू शकेल, असे ते म्हणाले. कार्यक्रमात सरदार वल्लभभाई पटेल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आणि अपना दलाचे महाराष्ट्र प्रभारी महेंद्र वर्मा म्हणाले की, आज आपल्या देशातील शेतकऱ्यांनी इतकी प्रगती केली आहे की, ते शेतीशिवाय बॅटरी, बेअरिंग्ज आणि इतर अनेक सुटे भाग बनवत आहेत. आणि त्यांचा पुरवठा परदेशात करणे. यामुळे देशाच्या प्रगतीला आणि विकासाला हातभार लागेल. सर्वधर्म विकास मंचचे अध्यक्ष मेघनाथ भगत, भाजपा नवी मुंबई जिल्हा उपाध्यक्ष प्रभाकर कोळपकर, जनकल्याण सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजेश शर्मा, अपना दल नवी मुंबई अध्यक्ष आशिष गोस्वामी यांनीही या कार्यक्रमात मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून आलेले सहायक पोलीस निरीक्षक योगेश गायकवाड यांचे पत्रकार परमानंद सिंग यांनी स्वागत केले.



## देवनारची हवा वाईट; वातावरणातील धुलीकणांचे प्रमाण वाढले; काळजी घेण्याचे आवाहन



■मुंबई। प्रतिनिधी,
गेल्या काही दिवसांपासून मुंबईमधील हवेचा निर्देशांक सुधारल्याचे निदर्शनास आले आहे. यापूर्वी हवेचा निर्देशांक मध्यम श्रेणीत नोंदला गेला होता. मात्र मागील काही दिवसांपासून सातत्याने तो समाधानकारक श्रेणीत नोंदला जात आहे. दरम्यान, समीर ऍपनुसार मंगळवारी सायंकाळी देवनार येथे वाईट हवेची नोंद झाली. वातावरणातील घातक पीएम२.५ आणि पीएम १० धूलिकणांचे प्रमाण वाढल्याचे निदर्शनास आले. देवनार येथे मंगळवारी सायंकाळी वाईट हवेची नोंद झाली. तिथे हवा गुणवत्ता निर्देशांक २९७ नोंदवला गेला. यामुळे अशा वातावरणात घराबाहेर पडणे घातक ठरू शकते. संसर्गजन्य आजार होण्याची शक्यता अधिक असते. याशिवाय माझगाव, शीव या परिसरातील हवा मध्यम असल्याची नोंद मंगळवारी करण्यात आली. मुंबई शहरातील धूलिकणांचे प्रमाण मागील काही दिवसांपासून कमी झाल्याचे दिसून आले. जानेवारीच्या सुरुवातीपासून मुंबईतील हवेच्या दर्जात सुधारणा झाल्याचे दिसले.

दरम्यान, मुंबई शहरात धुलीकणांचे दिवसेंदिवस वाढते प्रमाण लक्षात घेऊन मुंबई महापालिका, तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ठोस पावले उचलल्याने सुरुवात केली आहे. या पार्श्वभूमीवर हवेच्या गुणवत्तेत लक्षणीय सुधारणा झाली.

तसेच अनेक भागातील हवा गुणवत्ता निर्देशांकात जवळपास ५० टक्क्यांनी सुधारणा झाली आहे. दरम्यान, मंगळवारी सायंकाळी देवनार येथील हवा वाईट श्रेणीत नोंदली गेली. हवा गुणवत्ता निर्देशांकानुसार तेथील पीएम २.५ आणि पीएम १० धूलिकणांचे प्रमाण वाढल्याचे निदर्शनास आले.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निकषांनुसार, हवा गुणवत्ता निर्देशांक ०-५० म्हणजे चांगले, ५१-१०० मधील समाधानकारक, १०१-२०० दरम्यान मध्यम, २०१-३०० वाईट, ३०१-४०० दरम्यान अत्यंत वाईट आणि ४०० पेक्षा जास्त म्हणजे अतिधोकादायक समजली जाते. देवनार येथे पीएम २.५ कणांची मात्रा अधिक आहे. पीएम २.५ हे अधिक घातक असून ते श्वसनाद्वारे शरीरात जातात, त्यांचे हवेतील सामान्य प्रमाण हे ३५ मायक्रो घनाहून जास्त नसावे. किंबहुना हे कण पीएम१० च्या तुलनेत सूक्ष्म असल्याने सहज शरीरात प्रवेश करतात. त्यामुळे ते आरोग्यास घातक ठरतात.

## 'मोरारजी देसाईंचे पोलीस लालबाग-परळच्या चाळींवर...', संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील 'त्या' कृतीवरून ठाकरेंचा भाजपावर हल्लाबोल



■मुंबई। प्रतिनिधी,
राम मंदिरातील प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त ठाकरे गटाचे सर्वेसर्वा उद्धव ठाकरे यांनी काल (२२ जानेवारी) नाशिक दौरा केला. नाशिकमधील काळाराम मंदिरात जाऊन त्यांनी रामाचं दर्शन घेतलं. त्यानंतर आज (२३ जानेवारी) त्यांनी नाशिकमध्ये शिवसेना (ठाकरे गट) राज्यव्यापी अधिवेशन घेतलं. या अधिवेशनातून त्यांनी भाजपावर तुफान टीका केली. तसंच, संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा संदर्भ देत तत्कालीन जनसंघ पक्षालाही लक्ष्य केले.

जे म्हणतात आम्ही हिंदुत्त्व सोडलं, त्यांना सांगायचं आहे की तुम्ही तुमचा जनसंघ पक्ष घुसेल तिथे घुसवला. भारतीय जनता पक्ष पूर्वी जनसंघ पक्ष होता. जनसंघ पक्ष संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात उतरला नाही. संयुक्त महाराष्ट्राच्या समितीत ते जागेसाठी उतरले. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे म्हणून महाराष्ट्रात जे काहूर उठलं होतं म्हणजे अक्षरशः लालबाग-परळ भाग पेटला होता. मोरारजींचे पोलिस चाळींवर अश्रूधुरांच्या नळकांड्या मारत होते. घरांच्या आतपर्यंत अश्रूधुरांचे नळकांड्या पोहोचायचे. त्यामुळे महिला आणि त्यांची तान्ही पोरं घुसमटायची. असह्य झाल्यावर तेव्हा महिला काँग्रेसमध्ये गेल्या नव्हत्या. महिला पोलिसांसमोर उभ्या राहिल्या. असेल हिंमत तर समोरा-समोर गोळ्या झाडा, पण नामदार्चं काम करू नका, असं म्हणायच्या. त्या लढ्यात तेव्हा भारतीय जनता पक्ष नव्हताच, पण जनसंघ पक्षही नव्हताह, अशी घणाघाती टीका उद्धव ठाकरे यांनी केली.

**शामाप्रसाद मुखर्जींबद्दलही बोला**

संयुक्त महाराष्ट्राची समिती जनसंघाने जागावाटपाच्या भांडणात फोडली. त्या आधीचा जनसंघ आहे तो शामाप्रसाद मुखर्जींनी स्थापन केला. शामाप्रसाद मुखर्जींबद्दल आदर आहे. पण १९४०-४२ चा काळहीता चले-जाव आंदोलनाचा. शामाप्रसाद मुखर्जी बंगालमध्ये होते. १९४० च्या सुमारास देशातील मुस्लीम लीगने स्वतंत्र पाकिस्तानचा ठराव केला.

## बलात्काराच्या आरोपीचा पोलीस कोठडीत आत्महत्येचा प्रयत्न, हुडकेश्वर पोलीस ठाणे पुन्हा चर्चेत



■नागपूर। प्रतिनिधी,
अल्पवयीन मुलीवर बलात्कार करणाऱ्या आरोपीने हुडकेश्वर पोलीस ठाण्यात कोठडीत बंद असताना गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. मात्र, एका पोलीस कर्मचाऱ्याचे लगेच लक्ष गेल्यामुळे दुर्घटना टळली. शेख तौसीफ शेख फैजान (२३, रा. शहंशाह चौक, मोठा ताजबाग) असे आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीचे नाव आहे. यापूर्वी एका छायाचित्रकाला मारहाण करून ६ हजार रुपये उकळणे आणि एका रेतीच्या टीप्पर चालकाडून ४० हजार रुपये घेतल्यामुळे वादग्रस्त ठरलेले हुडकेश्वर पोलीस ठाणे पुन्हा चर्चेत आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शेख तौसीफने विशिष्ट समुदायाशी संबंधित असलेल्या अल्पवयीन मुलीला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. ती मुलगी शिक्षण सोडून तौसीफच्या प्रेमात वेडी झाली. तौसीफने तिला पळून जाऊन लग्न करण्याचे आमिष दाखवले. गेल्या आठवड्यात मंदिरात दर्शनासाठी आईवडिल गेल्यानंतर तौसीफने तिला घरातून पळवून नेले. मुलगी अचानक बेपत्ता झाल्यामुळे पालकांनी हुडकेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल करीत २१ जानेवारीला आरोपीला अटक केली. त्याला दोन दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले होते. तौसीफ सोमवारी रात्री साडेआठ वाजतापासून ब्लँकेटची दोरी तयार करीत होता. रात्री नऊ वाजता त्याने पोलीस ठाण्याच्या कोठडीच्या लोखंडी सळाखीला दोर बांधून गळफास घेतला. काही वेळाने एका महिला पोलीस कर्मचाऱ्याचे लक्ष कोठडीकडे गेल्यामुळे प्रकार लक्षात आला. पोलिसांनी धावपळ करीत कोठडीचे कुलूप उघडले आणि त्याचा गळफास सोडविला. तौसीफ कोठडीतच बेशुद्ध पडल्यानंतर त्याला लगेच मेडिकल रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यावर उपचार सुरु आहे. या प्रकरणी आरोपी तौसीफवर आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांचा हलगर्जीपणा एका आरोपीच्या जीवावर बेतला असता. गेल्या काही दिवसापासून हुडकेश्वर पोलिसांचा कारभार वादग्रस्त असून काही पोलीस कर्मचारी फक्त वसुलीत मग्न आहेत. डीबी पथक हॉटेल-ढाबेचालकांकडून रात्रीला वसुली करीत असल्याच्या नेहमी तक्रारी असतात.

## दारूसाठी पैसे मागणाऱ्या पती, मेहुणीच्या त्रासाला कंटाळून देहूरोडमध्ये तरुणाची आत्महत्या




■पिंपरी। प्रतिनिधी,
दारू पिण्यासाठी पैशांची मागणी करणाऱ्या पत्नी आणि मेहुणीच्या त्रासाला कंटाळून एकाने आत्महत्या केल्याची घटना देहूरोड येथे घडली. नारायण मधुकर निर्मळ (वय ३५) असे आत्महत्या केलेल्या पतीचे नाव आहे.

नारायण यांचे भाऊ ज्ञानेश्वर मधुकर निर्मळ (वय ३९, रा. सोमठाना, ता. मानवत, जि. परभणी) यांनी देहूरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. नारायण यांची पत्नी आणि मेहुणीला पोलिसांनी अटक केली. नारायण हे ॲनिमेशन व्यवसाय करीत होते.

त्यांच्याकडे दोघींनी दारू पिण्यासाठी पैशांची मागणी केली. त्यांना पत्नी आणि मेहुणी या दोघींनी मिळून मानसिक त्रास दिला. तसेच, नारायण यांच्या पत्नीच्या चुकीच्या कृत्यांना मेहुणीने प्रोत्साहन देऊन वाद घातला. या त्रासाला कंटाळून नारायण यांनी १७ जानेवारी रोजी घरी विषारी औषध प्राशन केले. त्यांना महापालिकेच्या वायसीएम रूग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान २० जानेवारी रोजी त्यांचा मृत्यू झाला.

## माजी मंत्री रवींद्र वायकर चौकशीला अनुपस्थित



■मुंबई। प्रतिनिधी,
ठाकरे गटाचे नेते व माजी मंत्री रवींद्र वायकर यांना जोगेश्वरी भूखंड गैरव्यवहार प्रकरणी सक्त वसुली संचलनालयाने (ईडी) समन्स पाठवून २३ जानेवारीला चौकशीला उपस्थित राहण्यास सांगितले होते. पण या चौकशीला वायकर अनुपस्थित राहिले. आरोग्याचे कारण देऊन चौकशीला अनुपस्थित राहत असल्याचे वायकर यांच्याकडून कळवण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले.

यापूर्वी ईडीने समन्स पाठवून वायकर यांना १७ जानेवारी रोजी चौकशीसाठी बोलावले होते. पण चौकशीला वायकर उपस्थित राहिले नव्हते. त्यामुळे ईडीने पुन्हा समन्स पाठवून त्यांना २३ जानेवारी रोजी चौकशीला उपस्थित राहण्यास सांगितले होते. पण यावेळीही वायकर यांनी आरोग्याचे कारण देऊन चौकशीला उपस्थित राहण्यासाठी कालावधी मागितला आहे. जोगेश्वरी भूखंड आणि पंचतारांकित हॉटेल प्रकरणातील आर्थिक व्यवहारांबाबत ईडी तपास करीत आहे. याप्रकरणी सप्टेंबर महिन्यात महापालिकेचे उपअभियंता संतोष मांडवकर यांच्या तक्रारीवरून आझाद मैदान पोलीस ठाण्यात रवींद्र वायकर यांच्यासह त्यांची पत्नी मनीषा वायकर, त्यांचे व्यावसायिक भागीदार आसू नेहलनाई, राज लालचंदानी, पृथ्वीपाल बिंद्रा आणि आर्किटेक्ट अरुण दुबे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्याचा तपास मुंबई पोलिसांची आर्थिक गुन्हे शाखा करीत आहे. याच गुन्ह्याच्या आधारावर ईडीने नोव्हेंबर महिन्यात एन्फोर्समेंट केस इन्फर्मेशन रिपोर्ट (ईसीआयआर) दाखल केला होता. त्याप्रकरणी ईडीने वायकर यांच्या घरासह सात ठिकाणी छापे टाकले होते.

**पवार यांची उद्या, तर पेडणेकर यांची परवा चौकशी**

महाराष्ट्र राज्य सहकारी बँक गैरव्यवहार प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनाईडीने समन्स पाठवून बुधवारी चौकशीसाठी बोलावले आहे. तसेच मृतदेहाच्या पिशव्या खरेदी प्रकरणात माजी महापौर किशोरी पेडणेकर यांना ईडीने समन्स पाठवून २५ जानेवारीला चौकशीला उपस्थित राहण्यास सांगितले आहे.

## पुणे पोलीस दलात खळबळ, फसवणुकीच्या गुन्ह्यात अटक न करण्यासाठी पाच लाखांची मागणी



■पुणे। प्रतिनिधी,
फसवणुकीच्या गुन्ह्यात पाच लाख रुपयांची लाच मागून एकाकडून तडजोडीत ४० हजार रुपयांची लाच घेणाऱ्या पुणे शहर पोलीस दलातील उपनिरीक्षकासह एका वकिलाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) सोमवारी रात्री अटक केली. एरंडवणे भागातील अलंकार पोलीस ठाण्याच्या आवारात ही कारवाई करण्यात आली. याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक गणेश वसंत चव्हाण (वय ३५, रा. शासकीय पोलीस वसाहत, परमारनगर, वानवडी), ॲड. राहुल जयसिंग फुलसुंदर (वय ३१, रा. चित्रदुर्ग अपार्टमेंट, कोथरुड) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखळ करण्यात आला. याबाबत एकाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली आहे. तक्रारदार तरुणाच्या भावाविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला होता. या गुन्ह्यात अटक न करणे, तसेच तपासात मदत करण्यासाठी पोलीस उपनिरीक्षक चव्हाण यांनी पाच लाख रुपयांची लाच मागितली होती. तक्रारदार तरुणाने तडजोडीत पहिला हप्ता म्हणून ४० हजार रुपये देण्याचे मान्य करून तक्रार दिली. त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा लावून चव्हाण यांच्यासाठी लाच घेणारे वकील ॲड.फुलसुंदर यांना सोमवारी रात्री पकडले. चौकशीत चव्हाण यांच्यासाठी लाच घेतल्याचे उघडकीस आल्यानंतर त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

## लोणावळ्यातील पितापुत्राने साकारला मनोज जरांगे पाटील यांचा मेणाचा पुतळा



■लोणावळा। प्रतिनिधी,
लोणावळ्यातील कार्ला येथे पितापुत्राच्या जोडीने मनोज जरांगे पाटील यांचा हुबेहूब मेणाचा पुतळा साकारला आहे. कार्ला येथील वॅक्स म्युझियममध्ये पुतळा पाहण्यासाठी नागरिक गर्दी करत आहेत. मराठा आरक्षणाच्या मागणीमुळे जरांगे हे प्रसिद्धी झोतात आले आहेत. ते मराठा आरक्षणासाठी आग्रही असून त्यांचं हे काम पुढील पिढीला कळावं म्हणून कार्ला येथील पुतळा आर्टिस्ट ऋषीकेश म्हाळसकर आणि अशोक म्हाळसकर या पितापुत्राच्या जोडीने जरांगे यांचा पुतळा साकारला आहे.

कार्ला येथे पितापुत्राच्या जोडीने मनोज जरांगे पाटील यांचा हुबेहूब मेणाचा पुतळा साकारला आहे. यासाठी जरांगे पाटील यांना भेटून म्हाळसकर यांनी मेणाचा पुतळा बनवण्यासाठी परवानगी आणि मोजमाप घेतले होते.

एरवी सहा महिने मेणाचा पुतळा बनवण्यासाठी लागतात मात्र, ऋषिकेश म्हाळसकर यांनी अवघ्या तीन महिन्यांत हा मेणाचा पुतळा साकारला आहे. बारकाईने आणि हुबेहूब पुतळा बनवणं हे म्हाळसकर यांच्यापुढे मोठं आव्हान होतं. पाच फूट सात इंच इतकी या पुतळ्याची उंची आहे.

## पुण्यात तीन ठिकाणी आगीच्या घटना; लष्कर भागातील मॉडर्न डेअरीला फटाक्यांमुळे आग



■पुणे। प्रतिनिधी,
शहरात तीन ठिकाणी आग लागण्याची घटना घडली. लष्कर भागातील मॉडर्न डेअरीत सोमवारी रात्री आग लागली. या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी धाव घेतली. पाण्याचा मारा करून वीस मिनिटांत आग आटोक्यात आणली. छतावर आग फटाक्यांमुळे लागली, अशी माहिती नागरिक आणि डेअरी मालकाने दिली.

अग्निशमन अधिकारी विजय भिलारे, कैलास शिंदे, रोहित रणपिसे यांनी आग आटोक्यात आणली. सोमवारी रात्री कुमठेकर रस्त्यावर एका सदनिकेत आग लागली. सुदैवाने या घटनेत कोणी जखमी झाले नाही. मंगळवारी सकाळी कोरेगाव पार्क येथील एका उपहारगृहात आग लागली. आगीत उपहरगृहातील साहित्य जळाले.

## बुलढाणा जिल्हा हादरला! वयोवृद्ध सासऱ्याने केली गर्भवती सून व नातवाची निर्घृण हत्या



■बुलढाणा। प्रतिनिधी,
वयोवृद्ध सासऱ्याने आपल्या गर्भवती सुनेची व नातवाची निर्घृण हत्या केल्याची खळबळजनक घटना आदिवासीबहुल संग्रामपूर येथे आज घडली. यामुळे तालुक्यासह बुलढाणा जिल्हा हादरला आहे. याप्रकरणी तामगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरू आहे. यामुळे घटनेचा तपशील कळू शकला नाही. प्राप्त प्राथमिक माहितीनुसार, संग्रामपूर शहरात आज, मंगळवारी ही घटना घडली.

यामध्ये ६५ वर्षीय आरोपी नारायण गायकी याने राहत्या घरातच आपल्या गर्भवती सून अश्विनी देवानंद गायकी व नातू समर्थ गायकी यांच्यावर कुऱ्हाडीने सपासप वार केले.

यामुळे ८ वर्षीय नातू जागीच ठार झाला तर सून गंभीररीत्या जखमी झाली. अश्विनीला रुग्णवाहिकेद्वारे प्रथम वरवट बकाल येथे व नंतर शेगाव येथील सईबाई मोटे उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले होते. मात्र, उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. आरोपी नारायण गायकी याला पोलिसांनी अटक केली आहे. पुढील तपास ठाणेदार सुरेंद्र पवार यांच्या मार्गदर्शनात उपनिरीक्षक दिपक सोळंके करीत आहे.

## प्रजासत्ताक दिनाला शिवरायांच्या राज्यकारभारावर आधारित चित्ररथ, यवतमाळच्या पाटणबोरीत साकारली शिल्पकृती



■यवतमाळ। प्रतिनिधी,
प्रजासत्ताकदिनी दिल्लीच्या कर्तव्यपथावर यंदा ह्यभारतीय लोकशाहीचे प्रेरणास्थान : छत्रपती शिवाजी महाराजह्न या संकल्पनेवर आधारित चित्ररथ पाहायला मिळणार आहे. शिवराज्याभिषेकाला ३५० वर्षे पूर्ण झाल्याबदल हा चित्ररथ राहणार आहे. महाराष्ट्र ह्न तेलंगणा सीमेवरील पाटणबोरी (ता. पांढरकवडा) येथील तरुणांनी केवळ दहा दिवसांमध्ये या चित्ररथातील शिल्प पाटणबोरी या गावात साकारले. या चित्ररथाची पहिली झलक आज मंगळवारी कर्तव्यपथावरील (दिल्ली) तालमीमध्ये अवघ्या देशाला पाहायला मिळाली. चित्ररथ साकारणाऱ्या कलावंतांमध्ये एकूण ३० कलावंतांचा सहभाग असून यात यवतमाळ जिल्ह्यामधील कलावंतांचा मोठा वाटा आहे. हा चित्ररथ साकारताना तुषार प्रधान (यवतमाळ) आणि रोशन इंगोले (वर्धा) यांनी कला दिग्दर्शकाची जबाबदारी सांभाळली. तर, यवतमाळ जिल्ह्यातील प्रसिद्ध शिल्पकार यशवंत एनगुतीवार (पाटणबोरी) हे शिल्पकला विभागाचे प्रमुख आहेत. त्यांच्या समुहामध्ये भूषण हजारे (कळंब), सूरज गाऊत्रे (सोनबर्डी, ता. केळापूर), पिंटू भोंग (पहापळ, ता. केळापूर), नितेश बावणे (घाटंजी), अक्षय बावणे, योगेश वहिले, अविनाश बावणे, निखिल दुर्षेट्टीवर, अरुण मेश्राम, सुमीत कानके (सर्व रा. पाटणबोरी) आदी शिल्पकारांचा समावेश आहे. श्रीपाद भोंगाडे (हिंगणघाट, जि. वर्धा) हे हस्तकला विभागाचे प्रमुख आहेत.

## एफटीआयआयच्या आवारात बाबरी मशिदीबाबत वादग्रस्त फलक, विद्यार्थी संघटनांमध्ये बाचाबाची



■पुणे। प्रतिनिधी,
राष्ट्रीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्थेच्या (एफटीआयआय) आवारात एका विद्यार्थी संघटनेने बाबरी मशीद पाडल्याच्या निषेधार्थ फलक लावल्याने तणाव निर्माण झाला. फलक लावण्यात आल्याची घटना उघडकीस आल्यानंतर मंगळवारी विद्यार्थी संघटनेच्या कार्यकर्त्यांमध्ये बाचाबाची झाली. अखेर फलक हटविण्यात आल्याने तणाव निवळला. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. काही विद्यार्थ्यांना ताब्यात घेतले. संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यात येणार आहे, अशी माहिती पोलीस उपायुक्त संदीपसिंग गिल यांनी दिली. अयोध्येत श्रीराम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळा सोमवारी (२२ जानेवारी) पार पडला.

एफटीआयआयच्या आवारात मंगळवारी रिमेंबर बाबरी डेथ ऑफ कॉनस्टिट्यूशन अशा आशयाचे फलक लावण्यात आल्याने तणाव निर्माण झाला. फलक लावण्यात आल्यानंतर विद्यार्थ्यांच्या दोन गटात वाद झाला. डेक्कन पोलिसांनी विद्यार्थ्यांना ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात नेण्यात आले. तणाव निर्माण केल्याप्रकरणी विद्यार्थ्यांविरुद्ध कारवाई केली जाणार असल्याची माहिती डेक्कन पोलिसांनी दिली. सिंहगड रस्त्यावरील नऱ्हे भागात एकाने घोषणाबाजी करून दोन तरुणांवर कोयत्याने वार करण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली.

## पळवलेल्या बाळाचा चार तासात शोध; भिकारी महिलेविरुध्द गुन्हा

■नाशिक। प्रतिनिधी,
पंचवटीतील श्री काळाराम मंदिरात सोमवारी दर्शनासाठी रामभक्तांमुळे झालेल्या गर्दीचा फायदा घेत संशयित महिलेने चोरलेले बाळ पोलिसांच्या तत्परतेने तीन ते चार तासांच्या आत परत मिळाले. या प्रकरणात एका भिकारी महिलेविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अयोध्येतील सोहळ्यामुळे सोमवारी शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कुठलाही अनुचित प्रकार घडू नये, म्हणून पोलिसांनी बंदोबस्त ठेवला होता. पंचवटीतील काळाराम मंदिरात भाविकांची दर्शनासाठी होणारी गर्दी लक्षात घेता गोदाकाठ परिसरासह अन्य ठिकाणी गस्त वाढवण्यात आली होती.

भद्रकाली पोलीस ठाण्याचे सहायक निरीक्षक सत्यवान पवार हे पथकासह गोदाकाठ परिसरात गस्त घालत असताना त्यांना पिंपळपार चौकात भिकारी महिला एक वर्षाच्या लहान बाळाला घेऊन आडोशाला भीक मागताना दिसली. महिला आणि तिच्याजवळील बाळ यांच्यात कोणतेही साम्य आढळत नसल्याने पोलिसांना संशय आला. गुन्हे शोध पथकाने महिलेकडे चौकशी केली असता ती उडवाउडवीची उत्तरे देऊ लागली.

तिच्या जवळचे बाळ हे मुलगा असल्याचे सांगितले. परंतु, पथकाने बाळाला ताब्यात घेऊन पाहणी केली असता बाळ मुलगी असल्याचे लक्षात आले.

## आयएएस, आयपीएस, खेळाडू होण्यापेक्षा पोलिस, शिक्षक होण्याकडे कल

■पुणे। प्रतिनिधी,
देशातील मुलांना आयएएस, आयपीएस, खेळाडू होण्यापेक्षा पोलिस, शिक्षक होण्यात जास्त रस आहे. तसेच २१ टक्के मुलांना काय करायचे याची माहिती नाही किंवा विचार केलेला नाही, तर २.१ टक्के मुलांना काम करण्यात रस नसल्याचे समोर आले आहे. ह्यअसरह्नने बियाँड बेसिक्स हा अहवाल नुकताच जाहीर केला. त्यात देशभरातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक स्थितीसह विद्यार्थ्यांच्या करिअरबाबतही सर्वेक्षण करण्यात आले. त्यातून विद्यार्थ्यांचे कल स्पष्ट झाले आहेत. अहवालातील आकडेवारीनुसार, देशभरातील १३ टक्के मुलांना पोलिस होण्यात रस आहे. त्यात १३.६ टक्के मुलगे, तर १२.५ टक्के मुली आहेत. शिक्षक होण्याची इच्छा असलेल्या ११.४ टक्के मुलांमध्ये १६ टक्के मुली, तर ६ टक्के मुलगे आहेत. १४.८ टक्के मुलींना डॉक्टर व्हायचे आहे, तर ८.४ टक्के मुलींनी परिचारिका होण्याची इच्छा आहे. ७.७ टक्के मुलांना लष्करात जाण्याची इच्छा आहे. त्यात १३.३ टक्के मुलगे, तर २.४ टक्के मुली आहेत. अभियंता होण्याची इच्छा ६.३ टक्के मुलांना आहे. त्यात ९.६ टक्के मुलगे, तर ३.४ टक्के मुली आहेत. कोणतीही सरकारी नोकरी चालेल शी ४.६ टक्के मुले आहेत. त्यात ५.४ टक्के मुले आणि ३.९ टक्के मुली आहेत. प्रशासकीय सेवांमध्ये आयएएस आणि आयपीएस ही सनदी अधिकारी पदांचा विशेष महत्त्व आहे. मात्र केवळ २ टक्के मुलांना आयएएस, १.४ टक्के मुलांना आयपीएस होण्यात रस वाटत आहे. १.९ टक्के मुले स्वतःचा किंवा कौटुंबिय व्यवसाय करणार आहेत, तर शेतीसंबंधित कामे १.४ टक्के मुले करणार आहेत.